महाराष्ट्र शासन
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

**क्रमांक** :२२५१/पोउनि-तृशाचा/२०२३/१५ **दिनांक** :- ०५ एप्रिल, २०२४

# -: प्रसिद्धीपत्रक :-

**विषय :-** पोलीस उपनिरीक्षक पदासाठी घेण्यात येणा-या स्पर्धा परीक्षेकरीता तृतीयपंथी उमेदवारांसाठी शारीरिक चाचणीची मानके व गुण लागू करणेबाबत.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणा-या पोलीस उपनिरीक्षक मुख्य स्पर्धा परीक्षेतील शारीरिक चाचणीकरिता तृतीयपंथी उमेदवारांसाठी शारीरिक चाचणीची मानके व गुण निश्चित करण्याची बाब आयोगाच्या विचाराधीन होती.

२. त्यासंदर्भात **'स्वत:ची लिंग ओळख पुरुष अशी केलेल्या तृतीयपंथी उमेदवारांकरिता'** आणि **'स्वत:ची लिंग ओळख महिला/तृतीयपंथी अशी केलेल्या तृतीयपंथी उमेदवारांकरिता'** शारीरिक चाचणीची मानके व गुण आयोगामार्फत खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आले आहेत.

**शारीरिक चाचणीचा तपशील:-**

| **स्वत:ची लिंग ओळख पुरुष अशी केलेल्या तृतीयपंथी उमेदवारांकरिता** | **स्वत:ची लिंग ओळख महिला/तृतीयपंथी अशी केलेल्या तृतीयपंथी उमेदवारांकरिता** |
|---|---|
| १) गोळा फेक- वजन- ७.२६० कि.ग्रॅ.- कमाल गुण-१५ | १) गोळा फेक- वजन- ४ कि.ग्रॅ.- कमाल गुण-२० |
| २) पुलअप्स- कमाल गुण-२० | २) धावणे (४०० मीटर )- कमाल गुण-५० |
| ३) लांब उडी- कमाल गुण-१५ | ३) लांब उडी- कमाल गुण-३० |
| ४) धावणे (८०० मीटर )- कमाल गुण-५० | -- |

**३. सन-२०२२ च्या परीक्षेकरिता:-** शारीरिक चाचणीचे गुण अर्हताकारी करण्यात आले असून, शारीरिक चाचणीत उत्तीर्ण होण्यासाठी एकूण गुणांपैकी किमान ६० टक्के गुण (म्हणजे ६० गुण) मुलाखतीस पात्र होण्यासाठी आवश्यक राहतील. तसेच या गुणांचा अंतिम गुणवत्तेकरिता/अंतिम निवडीकरिता विचार होणार नाही.

**४. सन-२०२३ च्या परीक्षेकरिता:-** शारीरिक चाचणीचे गुण अर्हताकारी करण्यात आले असून, शारीरिक चाचणीत उत्तीर्ण होण्यासाठी एकूण गुणांपैकी किमान ७० टक्के गुण (म्हणजे ७० गुण) मुलाखतीस पात्र होण्यासाठी आवश्यक राहतील. तसेच या गुणांचा अंतिम गुणवत्तेकरिता/अंतिम निवडीकरिता विचार होणार नाही.

**टीप:-** तृतीयपंथी उमेदवारास त्यांची पुरुष, महिला किंवा तृतीयपंथी अशी स्वत:ची लिंग ओळख निश्चित करणे आवश्यक राहील व यासंदर्भात विहित सक्षम प्राधिका-याने दिलेले विहित नमुन्यातील प्रमाणपत्र शारीरिक चाचणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

परीक्षा नियंत्रक व सह सचिव
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

ठिकाण: नवी मुंबई